क्रमांक : ६२६६/वि.प.वि.अ.स. /ड-१५
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : [redacted], २०२१
08 APR 2021

**:ज्ञापन :**

**विषय** : विधानपरिषद विनंती अर्ज समिती अंतर्गत उप समिती नियुक्त करणेबाबत...

**संदर्भ** : या सचिवालयाचे ज्ञापन क्रमांक ४५२६/विपविअस/ड-१५, दिनांक १० मार्च, २०२१.

**उपरोक्त संदर्भाधीन ज्ञापन अधिक्रमित करुन प्रस्तावित सुधारित ज्ञापन निर्गमित करण्यात येत आहे.**

**"अकोला महानगरपालिकेच्या अनागोंदी कारभाराविषयी कार्यवाही होण्याकरीता"** या विषयावरील श्री.गोपीकिसन बाजोरिया वि.प.स. यांच्या विनंती अर्जासंदर्भात विधानपरिषद विनंती अर्ज समितीच्या गुरुवार, दिनांक ०४ मार्च, २०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख, विधानपरिषद विनंती अर्ज समिती यांनी सदर प्रकरणी पुर्नतपासणी करण्यासाठी उप समिती नेमण्याच्या दिलेल्या निदेशानुसार महाराष्ट्र विधानपरिषद नियम १६७ मधील तरतुदींच्या अनुषंगाने खालील मा. विधानपरिषद सदस्यांचा समावेश असलेली उप समिती नियुक्त करण्यात येत आहे.

१) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.

२) श्री. निलय नाईक, वि.प.स.

३) श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. तथा विधानपरिषद विनंती अर्ज समितीचे विशेष निमंत्रित

**उप समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे असेल :-**

सदर उप समिती, अकोला महानगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात योजनेमध्ये अनियमित खर्च, कामकाजातील त्रुटी गैरकारभार, अनुदानाचा गैरवापर, अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात समन्वय नसणे, पंतप्रधान आवास योजनेमध्ये मंदगतीने कामे सुरू असणे,शौचालयाच्या कामात अनियमितता तसेच १२ व १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये अनियमितता इत्यादी संदर्भात प्रत्यक्ष अकोला महानगरपालिकेस भेट देऊन आवश्यक ती कार्यवाही करुन याबाबतचा अहवाल विधानपरिषद विनंती अर्ज समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करील.

(विलास आठवले)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

...२/-

G:\gopikisan bajoria २०२१\१०.३.२०२१ new\gyapan.docx

**याची प्रत :**

१. विधानपरिषद विनंती अर्ज समितीचे सर्व सदस्य
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. सर्व अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. प्रधान महालेखापाल (१), महाराष्ट्र, मुंबई.
५. प्रधान महालेखापाल (२), महाराष्ट्र, नागपूर.
६. संचालक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
७. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
८. मा.उप सभापती, तथा समिती प्रमुख विधानपरिषद विनंती अर्ज समिती यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
९. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
१०. मा. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक
११. प्रतिवेदक (निवडश्रेणी) /कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
१३. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४. व्यवस्थापक, आकाशवाणी आमदार निवास/विस्तारित जूने विधान भवन, मुंबई
१५. व्यवस्थापक, आमदार निवास, नागपूर.
१६. व्यवस्थापक, शासकीय विश्राम धाम, (जूने व शासकिय विश्राम भवन) (नवीन) क्वीन्स गार्डन, पुणे
१७. व्यवस्थापक, शासकीय विश्रामगृह, अमरावती
१८. व्यवस्थापक, सुभेदारी गेस्ट हाऊस, औरंगाबाद.
१९. संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
२०. विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.